खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र २

### विषय

## सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती-II

### प्रकरण १

## सहकारी संस्थांचे प्रकार

# प्रकरण १
# सहकारी संस्थांचे प्रकार

१.१ प्रस्तावना /अर्थ /व्याख्या/ वैशिष्ट्ये
१.१.१ प्रस्तावना
१.१.२ अर्थ
१.१.३. व्याख्या
१.१.४ सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये
१.१.५. सहकारी संस्थांचे फायदे आणि तोटे
१.२ सहकारी संस्थांचे प्रकार
१.२.१ ग्रामीण सहकारी संस्था
१.२.२ शहरी नागरी सहकारी संस्था
१.२.३ कृषी शेती सहकारी संस्था
१.२.४ बिगर कृषी शेती सहकारी संस्था
१.२.५ सहकारी पतसंस्था/सहकारी पत पुरवठा संस्था
१.२.६ सहकारी बिगर पत पुरवठा संस्था
१.२.७.दुर्बल घटकांच्या सहकारी संस्था
१.२.८. सहकारी संघ

## १.१.१ प्रस्तावना

या प्रकरणांमध्ये आपण विविध सहकारी संस्थांचा अभ्यास करणार आहोत. त्यामध्ये ग्रामीण सहकारी संस्था आणि या ग्रामीण सहकारी संस्थेची कार्य तसेच शहरी सहकारी संस्था म्हणजेच नागरी सहकारी संस्था आणि या संस्थेची कार्य तसेच कृषी किंवा शेती सहकारी संस्था आणि या संस्थेची वैशिष्ट्य आणि कार्ये तसेच बिगर कृषी किंवा शेती सहकारी संस्था आणि या संस्थेची कार्य तसेच सहकारी पतसंस्था आणि सहकारी पतसंस्थेचे महत्व त्याचबरोबर दुर्बल घटकांच्या सहकारी संस्था आणि सहकारी संघ आणि या सहकारी संघाचे महत्त्व यांचा अभ्यास आपण करणार आहोत. याचा सविस्तर अभ्यास आपण पुढे करूया.

## १.१.२ अर्थ

सहकारी संस्था ही सामान्य गरजा असणाऱ्या व्यक्तींची स्वयंसेवी संस्था आहे जी सामान्य आर्थिक हित साधण्यासाठी स्थापन केली जाते.. बचत व परस्पर मदतीच्या तत्त्वाद्वारे समाजातील गरीब घटकांचे हित साधणे हे त्याचे उद्दीष्ट आहे. थोडक्यात सहकारी

संस्था म्हणजे अशा संस्था असतात की ज्या सहकाराच्या तत्त्वावरती स्थापन झालेल्या असतात आणि सहकाराच्या तत्त्वांची अंमलबजावणी करून समाजातील गरीब जनतेचे हीच साधत असतात.

## १.१.३ व्याख्या

१ ) एच.कॅल्व्हर्ट-

" मानवी भूमिकेतून व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हिताच्या वृध्दीसाठी समानतेच्या तत्त्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय . "

२ ) श्री . वैकुंठलाल मेहता ( भारतीय सहकारी चळवळीचे प्रणेते ) -

" समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन आपल्या समान आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने स्थापन केलेला संघटन प्रकार म्हणजे सहकारी संस्था होय . "

## १.१.४ सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये

१.ही एक स्वयंसेवी संस्था असल्याने, सदस्यत्व देखील ऐच्छिक आहे. एखादी व्यक्ती सहकारी संस्थेत सामील होण्यासाठी स्वतंत्र आहे आणि आपल्या इच्छेनुसार कधीही सोडली जाऊ शकते. त्यांचा धर्म, लिंग आणि जात असो, सदस्यत्व सर्वांसाठी खुले आहे.

२.सहकारी संस्था नोंदणी करणे अनिवार्य आहे. सहकारी संस्था ही समाजासाठी वेगळी कायदेशीर ओळख आहे.

३.सहकारी संस्थेच्या सदस्यांचे मर्यादित दायित्व आहे. भांडवल म्हणून सदस्यांनी दिलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत दायित्व मर्यादित आहे.

४.निवडलेल्या व्यवस्थापकीय समितीकडे निर्णय घेण्याचे अधिकार असतात. सदस्यांना मतदानाचा अधिकार आहे, ज्याद्वारे ते व्यवस्थापकीय समिती नेमतील अशा सदस्यांची निवड करतात.

५.सहकारी संस्था परस्पर मदत व कल्याण या तत्त्वावर कार्य करते. म्हणूनच, जर कोणतेही अतिरिक्त उत्पन्न असेल तर ते सदस्यांमध्ये लाभांश म्हणून वितरित केले जाते.

## १.१.५. सहकारी संस्थांचे फायदे आणि तोटे

## सहकारी संस्थांचे फायदे

१. निर्मिती सहज:

ही एक स्वयंसेवी संस्था असल्याने कोणत्याही दहा सदस्यांद्वारे ते तयार करणे सोपे आहे. त्याची नोंदणी देखील सोपी आहे.

२. अमर्यादित सदस्यताः

जास्तीत जास्त सदस्यांच्या संदर्भात कोणतेही बंधन नाही. त्यामुळे सहकारी संस्थेमध्ये कितीही सदस्य असू शकतात.

३.लोकशाही व्यवस्थापन:

ह्या संस्था लोकशाही आहे. ज्यात प्रत्येक सदस्याकडे कितीही समभाग असले तरी ते फक्त एकच मतासाठी पात्र आहेत. हुकूमशाही पद्धतीचा अवलंब येथे होत नाही.

४.मर्यादित दायित्व:

सोसायटीच्या सदस्यांची जबाबदारी त्याच्याकडे असलेल्या शेअर्सच्या नाममात्र मूल्यापुरती मर्यादित आहे. त्यामुळे संस्थेची देणी देण्यासाठी त्यांची स्वतःची मालमत्ता धोक्यात घालावी लागत नाही.

५.अखंड अस्तित्व:

सदस्याच्या मृत्यूने किंवा दिवाळखोरीमुळे संस्थेवर परिणाम होत नाही. त्यामुळे संस्थेचे आयुष्य हे अखंड निरंतर असते.

अशाप्रकारे काही सहकारी संस्थेचे फायदे सांगता येतील. आता आपण सहकारी संस्थेच्या काही तोट्यांचा आढावा घेऊ

**सहकारी संस्थांचे तोटे**

ज्याप्रमाणे सहकारी संस्थेला काही फायदे आहेत त्याच प्रमाणे खालील देखील काही तोटे आपणास आढळतात.

१. मर्यादित स्त्रोत:

सहकारी संस्था ह्या भांडवल मोठ्या प्रमाणावर वाढवू शकत नाहीत कारण सदस्यांना जास्त गुंतवणूक करता येणार नाही. त्यांची गुंतवणूक मर्यादित राहते.

२. मर्यादित व्याप्ती:

सहकारी संस्थांमध्ये आवश्यक संसाधने मर्यादित असल्याने विस्ताराची शक्यता मर्यादित आहे. त्यामुळे हा देखील सहकारी संस्थेचा तोटा असल्याचे दिसते.

३. अपुरे व्यवस्थापन:

हे सहसा सदस्यांद्वारे व्यवस्थापित केले जाते आणि सदस्यांकडे अनुभवाची आणि व्यवस्थापकीय क्षमतेची कमतरता असू शकते.

४. गुप्तता नाही:

सहकारी संस्थेच्या व्यवसायाद्वारे गुप्तता ठेवता येत नाही. सहकारी संस्थेचे व्यवस्थापन हे सर्व सभासद मिळून होत असते.

५.सहकार्याचा अभाव:

कधीकधी सदस्यांमध्ये आपसात ऐक्य नसते ज्याचा परिणाम सहकारी संस्थांवर होऊ शकतो.

६. राजकीय हस्तक्षेप:

सहकारी संस्थांचे योग्य पद्धतीने काम काज करण्यासाठी राजकीय पक्षांचा हस्तक्षेप होऊ शकतो. या राजकीय हस्तक्षेपाचा उलटा प्रभाव देखील सहकारी संस्थेवर होऊ शकतो.

अशाप्रकारे सहकारी संस्थेची काही तोटे आपणास स्पष्ट करता येते.

## १.२ सहकारी संस्थांचे प्रकार

या घटकांमध्ये आपण विविध सहकारी संस्थांच्या प्रकारांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत तो पुढील प्रमाणे.

### १.२.१ ग्रामीण सहकारी संस्था/Rural Cooperative Societies

मुख्यतः ग्रामीण भागातील उद्योगांना तसेच ग्रामीण भागातील लोकांना हातभार लागावा यासाठी ग्रामीण सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागाचा विकास करणे आणि तेथे राहणाऱ्या लोकांना आर्थिक मदत करणे आहे.ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासामध्ये सहकार्य करण्याची महत्त्वाची भूमिका ग्रामीण सहकारी संस्था करतात. ग्रामीण सहकारी संस्थांचा विचार करता या प्रकारांमध्ये विविध सहकारी संस्थांचा समावेश होतो जसे की दुग्ध व्यवसाय संस्था, मत्स्य बीज पालन संस्था, कुक्कुटपालन संस्था, साखर कारखाने इत्यादी.

### १.२.२ शहरी सहकारी संस्था/नागरी सहकारी संस्था/Urban Co-operative Societies

शहरी सहकारी संस्थेला नागरी सहकारी संस्था असे म्हटले जाते. शहरी भागामध्ये कार्यरत असणाऱ्या संस्थांना शहरी किंवा नागरी सहकारी संस्था म्हणतात.

ग्रामीण सहकारी संस्थेचा विचार करता त्या तुलनेत शहरी किंवा नागरी सहकारी संस्थेचा विचार करणे गरजेचे ठरते कारण ज्या प्रमाणात सहकाराचा विकास ग्रामीण भागामध्ये झालेला आहे त्या तुलनेत खूप जास्त प्रमाणामध्ये सहकाराचा विकास हा शहरी भागामध्ये झालेला दिसून येतो. शहरी किंवा नागरी सहकारी संस्था ह्या शहरी भागाचा विकास करणे आणि आर्थिक स्थिती सांभाळणे या उद्देशाने स्थापन केलेल्या असतात. शहरी भागामध्ये शहरी सहकारी संस्थांची स्थापना झाल्यामुळे शहरातील लोकांना सहकाराचे महत्व सहकाराची व्याप्ती आणि सहकाराची तत्वे याबद्दल माहिती मिळाली.

### १.२.३ कृषी सहकारी संस्था/ शेती सहकारी संस्था (Agriculture Co-operative Societies)

कृषी सहकारी संस्थेला शेती सहकारी संस्था असे म्हणतात. या संस्था स्थापन करण्याचा मुख्य उद्देश हा कृषी क्षेत्राचा विकास करणे म्हणजेच शेतकरी बांधवांना सहकार्य करून शेती क्षेत्राचा विकास करणे हा असतो.

शेतीसाठी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्थांना कृषी सहकारी संस्था असे म्हणतात.

साधारणता ग्रामीण भागातील किमान दहा व्यक्ती एकत्र येऊन कृषी सहकारी संस्थेची स्थापना करू शकतात. कृषी सहकारी संस्था या प्रकारात कृषी मालाची खरेदी विक्री करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या संस्था दुग्ध सहकारी संस्था तसेच कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढीपालन इत्यादी सहकारी संस्थांचा समावेश होतो. यासाठी संबंधित शेतमाल आणि पूरक व्यवसायात निर्माण होणाऱ्या वस्तूंची विक्री आणि उत्पादनवाढीस मदत करणे हे या कृषी सहकारी संस्थेचे मुख्य लक्ष असलेले आपल्याला पाहावयास मिळते.

### १.२.४ बिगर कृषी सहकारी संस्था /बिगर शेती सहकारी संस्था (Non Agriculture Co-operative Societies)

बिगर कृषी सहकारी संस्था म्हणजेच बिगर शेती सहकारी संस्था होय. बिगर कृषी सहकारी संस्था या बिगर कृषी म्हणजेच बिगर शेती कारणांसाठी स्थापन झालेल्या असतात. अल्पमुदतीचे,मध्यम मुदतीचे किंवा दीर्घ मुदतीचे कर्ज पुरवण्याचं काम या संस्था करतात.

शेती क्षेत्र वगळता अन्य क्षेत्रांचा म्हणजेच उद्योग क्षेत्राचा विकास करण्याचे कार्य बिगर कृषी संस्था करत असतात.बिगर कृषी संस्थेचा विचार करता या प्रकारांमध्ये गृहनिर्माण संस्था, शिक्षक सेवक बँका वाहन धारकांच्या पतपुरवठा संस्था, मजूर संस्था, व्यापारी वर्गाच्या सहकारी संस्था,कुंभार संस्था, मुद्रण संस्था, सहकार चित्रनिर्मिती संस्था इत्यादी संस्थांचा समावेश यात होतो. देशाच्या आर्थिक विकासाचा विचार करता या संस्थांचे महत्त्व आणि त्यांचे योगदान भरपूर असल्याचे आपणास दिसून येते.

### १.२.५ सहकारी पतसंस्था/सहकारी पतपुरवठा संस्था (Credit Co-operatives)

देशाच्या आर्थिक विकासाचा सक्षमीकरण यामध्ये सहकारी पतसंस्था यांचा हातभार हा खूप मोठा लाभलेला आहे विशेषतः ग्रामीण भागांमध्ये शेतकऱ्यांना या सहकारी पतसंस्थाचा खूप मोठा फायदा झालेला दिसून येतो.

सहकारी पतसंस्थेचा विचार करता यामध्ये नागरी सहकारी पतसंस्था, ग्रामीण सहकारी संस्था, नागरी सहकारी बँका व पतसंस्था, राज्य सहकारी बँका, मध्यवर्ती सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतसंस्था, राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक, प्राथमिक सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक यांचा समावेश होतो.

त्यांचा आपण थोडक्यात अभ्यास करू प्रथमतः सहकारी पतसंस्थेचे दोन गटांमध्ये विभागणी केली जाते एक सहकारी किंवा नागरी सहकारी पतसंस्था दोन ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था.

**१. शहरी किंवा नागरी सहकारी पतसंस्था**

शहरी किंवा नागरी पतसंस्था मध्ये नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्थेचा समावेश होतो या पतसंस्था शहरातील जे लोक कमी उत्पन्न गटातील नागरिकांना आहेत लहान व्यापारी आहेत किंवा लघु उद्योग धंदे करणारे व्यक्ती आहेत त्यांच्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करतात यांचा मुख्य उद्देश हा शहरी लोकांतील शहरी लोकांना पतपुरवठा करणे आणि त्यांचे राहणीमान उंचावून देशाच्या आर्थिक विकासात हातभार लावणे हा असतो.

**२. ग्रामीण सहकारी पतसंस्था**

या ग्रामीण सहकारी पतसंस्थेचे पुन्हा दोन गटांमध्ये विभागणी केली जाते एक म्हणजे अल्पकालीन आणि दुसरे म्हणजे दीर्घकालीन सहकारी पतसंस्था. आपण प्रथम अल्पकालीन सहकारी पतसंस्थेची पतसंस्थेचा विचार करूया.

**A. अल्पकालीन सहकारी पतसंस्था**

अल्पकालीन सहकारी पतसंस्था मध्ये राज्य सहकारी बँका(State Co-operative Banks), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (District Central Co-operative Banks) आणि प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था(Primary Agricultural Credit Societies) यांचा समावेश होतो. यांचा मुख्य उद्देश हा ग्रामीण भागातील लोकांना पतपुरवठा करणे आणि त्यांचे राहणीमान उंचावून देशाच्या आर्थिक विकासामध्ये हातभार लावणे हा असतो.

प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था वर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका नियंत्रण ठेवतात आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर ती राज्य सहकारी बँका नियंत्रण ठेवतात. अशी यांची त्रिस्तरीय रचना असते.यातील प्रत्येक बँका किंवा पतसंस्था आपापली कार्य आपापल्या पातळीवरती पार पाडत असतात.

**B. दीर्घकालीन सहकारी पतसंस्था**

दीर्घकालीन सहकारी पतसंस्था मध्ये राज्य पातळीवरती राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक(State Co-operative Agriculture And Rural Development Banks) यांचा समावेश होतो. सध्या राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँकांची संख्या सोळा आहे. तसेच जिल्हा पातळीवर ती प्राथमिक सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक (Primary Co-operative Agriculture And Rural Development Banks) यांचा समावेश होतो. या दीर्घकालीन सहकारी पतसंस्थेचा काही राज्यांमध्ये एकतरी रचना आढळते तर काही राज्यांमध्ये दोन स्तरीय म्हणजेच द्विस्तरीय रचना असल्याचे आपणास पहायला भेटते.

या सहकारी बँकांवर राज्य सहकार रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक म्हणजेच नाबार्ड बँकेचे नियंत्रण असते. ज्या राज्यांमध्ये प्राथमिक सहकारी पतसंस्था कार्य करीत नाहीत तेथे प्रादेशिक ग्रामीण बँका मार्फत कामकाज पाहिले जाते.

## सहकारी पतसंस्थेचे महत्व

१.सहकारी पतसंस्था स्थापन झाल्यामुळे सहकारी पतसंस्थेचे सभासदांना आपले सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण मिळाले त्यामुळे तेदेखील सहकारी पतसंस्थेचे महत्व आपणास पाहायला मिळते.

२.सहकारी संस्थांच्या स्थापन सहकारी पतसंस्थांच्या स्थापनेमुळे जो दुर्बल वर्ग तसेच मध्यम शेतकरी वर्ग आहे अशा वर्गाला आधार मिळाला, प्रोत्साहन मिळाले त्यामुळे त्यांचे जीवनमान हे गतिमान बनले.

३.सहकारी पतसंस्था या पतपुरवठा करत असल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाची स्थिती चांगल्या पद्धतीमध्ये सुधारली आहे.वेगवेगळी रासायनिक खते, बियाणे, कीटकनाशके तसेच पीक कर्जाची सुविधा शेतकरी सहकारी पतसंस्थेकडून घेतात त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती सुधारलेली आहे.

४.सहकारी पतसंस्था या ग्रामीण भागाला आपले कार्यक्षेत्र मानत असल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास हा चांगल्या पद्धतीने झालेला आपणास पहावयास मिळतो.

५. देशाच्या आर्थिक विकासामध्ये मोठा हातभार सहकारी पतसंस्थेचा लाभलेला आहे.

६. सहकारी पतसंस्थेची स्थापना सहकारी तत्त्वावरती झाल्यामुळे सहकार क्षेत्राचा विकास हा चांगल्या पद्धतीने झालेला पहावयास मिळतो.

अशा पद्धतीने सहकारी पतसंस्थेचे महत्व आपणास पाहायला मिळते.

## १.२.६ बिगर पतपुरवठा सहकारी संस्था/ Non Credit Co-operatives

सहकारी पतपुरवठा संस्था या सहकारी तत्त्वावर ती पतपुरवठा करण्याचे काम पाहत असतात. मात्र केवळ उद्योगासाठी किंवा व्यवसायासाठी पतपुरवठा करून लोकांच्या गरजा मात्र पूर्ण झालेल्या नाहीत. लोकांना त्यांच्या जीवनावश्यक वस्तू किंवा राहण्यासाठी निवारा किंवा योग्य आणि रास्त भावामध्ये जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व्हावा, यासाठी सहकारी बिगर पतपुरवठा संस्थेची स्थापना केलेली असते. या संस्था म्हणजेच सहकारी बिगर पतपुरवठा संस्था ह्या पतपुरवठ्याची कामे न करता या व्यतिरिक्त लोकांच्या गरजा भागवण्यासाठीची कामे करत असतात. थोडक्यात या बँका पतपुरवठ्याची कामे न पाहता त्या व्यतिरिक्त असणाऱ्या लोकांच्या गरजा भागवण्यासाठी काम करत असतात.

**A. सहकारी गृहनिर्माण संस्था (Co-operative Housing Societies)**

सहकारी गृहनिर्माण संस्था ह्या गृहनिर्मिती ची कामे पाहत असतात. लोकांना योग्य दरामध्ये आणि योग्य किमती मध्ये राहण्यासाठी निवारा म्हणजेच घरे बांधून ती घरे लोकांसाठी उपलब्ध करून देण्याची कामे सहकारी गृहनिर्माण संस्था करत असतात.ह्या संस्था सहकारी तत्त्वावर ती स्थापन झालेल्या असतात म्हणून त्यांना सहकारी गृहनिर्माण संस्था असे म्हणतात. सहकारी गृहनिर्माण संस्थेची काही वैशिष्ट्ये आहेत त्यांचा आपण थोडक्यात अभ्यास करू.

१. राहण्यासाठी म्हणजेच निवाऱ्यासाठी गरज असणारे व्यक्ती एकत्र येऊन या संस्थेची स्थापना करत असतात.

२. या संस्था आपल्या सभासदांना एकदम वाजवी आणि अत्यंत कमी किमती मध्ये राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देतात.

३. या संस्थेचे कामकाज हे आपल्याच संवर्धन द्वारे मिळालेल्या भांडवलावर चालत असते.

४. सभासदांना बचतीची सवय लागते

५. सहकारी गृहनिर्माण संस्था मुळे त्यांच्या ग्राहकांना सामूहिक जीवन जगण्याचे प्रेरणाही मिळते.

आता आपण ग्राहक सहकारी संस्थांचा अभ्यास करू.

**B. ग्राहक सहकारी संस्था (Consumer C-operatives)**

ग्राहक वर्गाचे हित जोपासण्यासाठी या ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना झालेली असते. या संस्थांचा मुख्य उद्देश हा ग्राहकांना त्यांच्या जीवनावश्यक वस्तूंचा योग्य किमतीने वाजवी किमतीने पुरवठा करणे हा असतो. या संस्था फक्त ग्राहकांच्या समाधान याचाच विचार करतात. योग्य दर्जाचा माल योग्य किमतीला वाजवी किमतीला विकणे हे या संस्थांचे मुख्य कार्य असते. मुख्यतः या संस्था सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या असतात म्हणून या संस्था ग्राहक सहकारी संस्था या नावाने ओळखले जातात. ग्राहकांचे समाधान आधी आणि त्यानंतर स्वतःचा नफा याचा विचार या संस्थेमध्ये केला जातो.

ग्राहकांच्या सहकारी संस्थेच्या रचनेत, चार-स्तरीय प्रणाली कार्यरत आहे, ज्यात-

(i) पायाभूत स्तरावर प्राथमिक संस्था;

(ii) केंद्रीय / घाऊक संस्था;

(iii) राज्य स्तरावर सहकारी महासंघ; आणि

(iv) राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ.

**संघटन**

ग्राहकांचे सहकारी संस्था व्यवसायासारखेच कार्य करतात. मूलभूत वापराच्या वस्तूंचे वितरण करण्यासाठी त्यांची स्थापना केली जाते. सर्वसाधारणपणे अशा सहकारी संस्थांकडून केवळ भागधारक आणि सदस्यता घेतलेले सदस्यच त्यांची आवश्यक खरेदी करू शकतात. कोणतीही व्यक्ती शेअर्स खरेदी करून अशा सोसायटीचा भागधारक होऊ शकते किंवा नाममात्र फी देऊन सदस्य बनू शकते.

भागधारक आणि सदस्यांमधील संस्थेच्या निहित नोंदी ठेवल्या जातात. भागधारक किंवा सदस्याने केलेल्या गुंतवणूकीची किंवा भांडवलाच्या योगदानाची पर्वा न करता “एक-पुरुष-एक मत” या तत्त्वाचे काटेकोरपणे पालन केले जाते.

**ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये**

१.ग्राहकांच्या हितासाठी लोकशाही पद्धतीने व्यवसाय चालवणे.

२.ग्राहकांच्या हिताचे रक्षण करून ग्राहकांना योग्य किमतीचा माल आणि योग्य दर्जाचा माल विकणे.

३. ग्राहक सहकारी संस्थांची निर्मिती ही ग्राहकांच्या स्वच्छेने झालेली असते.

४. ग्राहकांना बचतीची प्रेरणा मिळते.

५. या संस्थेचे व्यवस्थापन आणि दैनंदिन कामकाज हे सभासदांकडून प्राप्त झालेल्या भागभांडवल वरच चालु असते.

**C. विपणन सहकारी संस्था (Marketing Co-operatives)**

या संस्था सुद्धा सहकारी तत्त्वावर ती स्थापन झालेल्या असतात. या संस्थेचा मुख्य उद्देश हा उत्पादकांनी तयार केलेला माल हा ग्राहकापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचवणे हा असतो. काही उत्पादक आपण तयार केलेला माल हा प्रत्यक्ष न विकता सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्थेमार्फत विकत असतात. म्हणजेच सहकाराच्या तत्त्वावरती विकत असतात, तेव्हा त्या संस्थेला सहकारी विपणन संस्था असे म्हणतात. ही संस्था सुद्धा शेतकरीवर्गाने स्थापन केलेली असते. यांचा मुख्य उद्देश हा उत्पादनापासून ग्राहकांपर्यंत मालाचा पुरवठा करणे, तो माल ग्राहकापर्यंत येण्यासाठी योग्य प्रक्रिया राबवणे हा असतो.

सदस्यांच्या उत्पादनाला स्थिर बाजारपेठ मिळावी या उद्देशाने ही स्थापन झालेली एक स्वयंसेवी संस्था आहे. ही संस्था विशेषतः शेतीविषयक उत्पादनाच्या विपणानासाठी महत्त्वाची ठरते. या संस्थेमार्फत पतपुरवठा साठवणूक सुविधा माहिती सुविधा आणि खरेदी विक्री संबंधीच्या व्यवहारासंबंधी सुविधा पुरवल्या जातात.

या संस्थांची काही कार्य आहेत त्यांचा थोडक्यात अभ्यास आपण करूया.

### D. उत्पादक सहकारी संस्था:

उत्पादक सहकारी किंवा औद्योगिक सहकारी संस्था सामूहिक उत्पादनासाठी संस्था आहेत. अशा प्रकारांमध्ये छोटे उत्पादक मोठ्या उत्पादकांशी प्रतिस्पर्धा करण्यासाठी सहकारात संघटित होऊ शकतात. हे दोन प्रकारे केले जाऊ शकते. प्रथम, उत्पादक सदस्य स्वतःहून (सोसायटीचे सदस्य म्हणून नव्हे) परंतु त्यांनी आवश्यक ते कच्चे माल, साधने आणि सोसायटीने त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या इतर उपकरणांच्या मदतीने वस्तू तयार करू शकतात. उत्पादक-सदस्यांनी उत्पादित वस्तू त्याच्या सदस्यात किंवा बाहेरील लोकांच्या पुढे विक्रीसाठी किंवा वितरणासाठी सोसायटीला विकल्या जाऊ शकतात.

दुसरे म्हणजे, स्वतः वैयक्तिकरित्या काम करण्याऐवजी उत्पादक-सदस्य सहकारी कर्मचारी होऊ शकतात आणि मजुरीसाठी काम करतात. या प्रकारच्या संघटनेतही आपल्या सदस्यांना कच्चा माल, साधने आणि इतर उपकरणे पुरवली जाऊ शकतात. तयार केलेला माल सोसायटी बाहेरील लोकांना विकू शकतो आणि / किंवा स्वतःच्या सदस्यांमध्ये वितरीत करतो.

## १.२.७.दुर्बल घटकांच्या सहकारी संस्था (Weaker Section Co-operatives)

दुर्बल घटकांच्या सहकारी संस्था म्हणजे या संस्था आर्थिक दुर्बल घटक असणाऱ्या घटकांना पतपुरवठा करण्यासाठी स्थापन झालेल्या असतात.या सहकारी संस्थांचा मुख्य उद्देश हा दुर्बल घटकांना सशक्त करून आर्थिक विकासामध्ये हातभार लावणे हा असतो.समाजातील काही दुर्बल घटक एकत्र येऊन एकमेकांच्या सहाय्याने या सहकारी संस्थांची निर्मिती करत असतात.

दुर्बल घटकांच्या सहकारी संस्थांच्या प्रकारांमध्ये खालील काही संस्थांचा समावेश होतो.

१. श्रमिकांची सहकारी संस्था
२. जंगल कामगार सहकारी संस्था
३. बलुतेदारांच्या सहकारी संस्था

### १. श्रमिकांची सहकारी संस्था

जेव्हा सर्व श्रमिक लोक एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर ती संस्थेची निर्मिती करतात तेव्हा त्या संस्थेला श्रमिक सहकारी संस्था म्हणतात या संस्थेमधील सर्व श्रमिक लोक एकत्र मिळून सर्व कामे करतात आणि त्या कामानुसार मिळणारा मोबदला ही एकमेकांमध्ये वाटून घेतात या संस्थेचा मुख्य उद्देश श्रमिक कामगार लोकांना मदत करणे आणि त्यांच्या अडचणी

सोडवून त्यांचे जीवनमान उंचावणे असा असतो इतर संस्थे प्रमाणे ही ह्या संस्थेचे काहीएक रचनात्मक सांगाडा आहे त्यात अध्यक्ष सचिव आणि काही पदाधिकारी लोक असतात.

या संस्थेचे आपणाला ३ स्तर पहावयास मिळतात त्यामध्ये गाव किंवा तालुका पातळीवर प्राथमिक श्रमिक सहकारी संस्था तसेच जिल्हा पातळीवर या संस्थांचे संघ आणि राज्य पातळीवर या संघांचा मिळून एक महासंघ तयार केल्या जातो. अशा पद्धतीमध्ये राज्य पातळीवर असणारा महासंघ हा जिल्हा पातळीवर त्या असणाऱ्या संघावर ती नियंत्रण ठेवत असतात आणि जिल्हा पातळीवर असणारे संघ हे प्राथमिक श्रमिक सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवत असतात या तीनही स्तरावरती असणाऱ्या संस्था तसेच संघ आणि महासंघ हे आपापली कार्य पार पाडत असतात या संस्थांच्या काही कार्यांचा आपण अभ्यास करूया.

**२. जंगल कामगार सहकारी संस्था**

भारतामध्ये औद्योगिकीकरणासाठी आज-काल जंगलतोड केली जाते त्यातून भरपूर प्रमाणात आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा पुरवठा देखील आदिवासी लोकांना होतो सर्वात जास्त लाकूडतोड जंगलातून केली जाते त्यासाठी लाकूड तोड करणाऱ्या लोकांना मोबदलाही दिला जातो पण हा कंत्राटी मोबदला त्यांच्या कामानुसार दिला जात नाही म्हणून त्यांना आवश्यक गोष्टींची पूर्तता होत नाही त्यामुळे काही कुशल लोक एकत्र येऊन सहकाराच्या तत्त्वावर ती एक संस्था स्थापन करतात त्या संस्थेला जंगल कामगार सहकारी संस्था म्हणतात या संस्थेचे सभासद किंवा सदस्य लोक हेच जंगल कामगार असतात.

ज्याप्रमाणे श्रमिक कामगार सहकारी संस्थेला रचना आहे त्याचप्रमाणे जंगल कामगार सहकारी संस्थेला ही रचना आहे दररोजचे कामकाज पाहण्यासाठी नऊ लोकांची एक व्यवस्थापन समिती तयार केली जाते यात वेगवेगळया विषयाचे आणि वेगवेगळया विभागाचे प्रतिनिधी लोक एकत्र येतात. आता आपण या संस्थेच्या काही कार्यांचा अभ्यास करू.

**३. बलुतेदारांची सहकारी संस्था**

आधी आपण श्रमिक कामगार संस्था आणि जंगल कामगार संस्थेचा अभ्यास केला आता आपण बलुतेदारांच्या सहकारी संस्थेचा अभ्यास करूया बलुतेदार ही संकल्पना पारंपारिक संकल्पना असल्याने ही संकल्पना आपणा सर्वांना माहितच आहे. बलुतेदार या संकल्पनेमध्ये लोहार, चांभार, कुंभार सुतार आणि इतर लोक या जातीच्या लोकांचा समावेश होतो. अशा लोकांनी एकत्र येऊन ह्या सहकारी संस्थांची स्थापना सहकारी तत्त्वावर ती केलेली असते. ह्या लोकांनी मिळून ही संस्था स्थापन केली असल्याने या संस्थेचे सभासद व अध्यक्ष हे त्यांच्यातीलच एक व्यक्ती असतो. या संस्थेच्या सगळया योजना धोरणेही बलुतेदारांच्या व्यवसायासाठी आणि त्यांच्या जीवन माणसासाठीच तयार केलेल्या जातात. आता आपण या संस्थांच्या काही कार्यांचा अभ्यास करूया.

## १.२.८ सहकारी संघ / Federation of Cooperative

सहकारी संघ या संकल्पनेचा विचार करता आपणास आढळून येते की सहकारी संघ म्हणजे सहकारी तत्त्वावर ती स्थापन झालेल्या सहकारी संस्थांनी एकत्र येऊन स्थापन केलेली एक मोठी संस्था म्हणजे सहकारी संघ होय. स्थानिक स्थानिक पातळीवर असणाऱ्या सहकारी संस्थांच्या गरजा पूर्ण करणे आणि त्यांच्या वरती एक नियंत्रण ठेवण्यासाठी सगळ्या सहकारी संस्था मिळून या संघाची स्थापना करतात. आपल्या उत्पादित मालाला योग्य दर्जा आणि योग्य भाव मिळण्यासाठी संघाची स्थापना केली जाते. सहकारी संघामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या संघांचा समावेश होतो मग यामध्ये खरेदी विक्री संघ साखर कारखाने संघ, गृहनिर्माण संघ, शेती पतपुरवठा संस्थांचा संघ यांचा समावेश होतो.

खरे पाहता या सहकारी संघाचे आपणास पाच स्तर पहावयास मिळतात ते खालील प्रमाणे

१. तालुका सहकारी संघ
२.जिल्हा सहकारी संघ
३.राज्य सहकारी महासंघ
४.राष्ट्रीय सहकारी महासंघ
५. आंतरराष्ट्रीय सहकारी महासंघ

आता आपण या पाच संघांचा थोडक्यात अभ्यास करूया.

### १. तालुका सहकारी संघ (Taluka Co-operative Union)

तालुका खरेदी-विक्री संघाचे निर्मिती ही ग्रामीण पातळींवर म्हणजेच स्थानिक पातळीवर असणाऱ्या सहकारी संस्थांच्या एकत्रित येण्याने होते.तालुका पातळीवरती असणाऱ्या सहकारी संस्थांवर ती नियंत्रण ठेवण्याचं काम तालुका खरेदी विक्री संघ करत असतात. त्या संस्थांना येणाऱ्या अडचणी पूर्णपणे सोडवण्याचा प्रयत्न तालुका खरेदी विक्री संघ करतो. म्हणजेच स्थानिक पातळीवरती असणाऱ्या सहकारी संस्थांवर देखरेख करण्याची जबाबदारी ही तालुका खरेदी विक्री संघाची असते.तालुका पातळीवर असणाऱ्या सहकारी संस्थांच्या उत्पादित मालाची खरेदी विक्री करण्याची जबाबदारी ही या संघाची असते.

थोडक्यात म्हणजे ग्रामीण किंवा स्थानिक पातळीवर असणाऱ्या सहकारी संस्थांसाठी ही एक वरिष्ठ मोठी संस्था म्हणजेच संघ आहे.सहकारी संस्थां बद्दलचे तालुका पातळीवरचे सर्व कामकाज हा संघ करत असतो.ग्रामीण पातळीवर सहकारी संस्थांना मार्गदर्शन तालुका सहकारी संघ करत असतो.

आता आपण जिल्हा खरेदी विक्री संघ याविषयी चर्चा करूया.

## २. जिल्हा सहकारी संघ (District Co-operative Union)

जिल्हा सहकारी संघाचे कामकाज हे जिल्हा पातळीवर असते.जिल्हा पातळीवर ती कार्यरत असणाऱ्या सहकारी संस्थांच्या एकत्रित येण्याने या जिल्हा सहकारी संघाची स्थापना झालेली असते.या जिल्हा पातळीवरील सहकारी संस्थांच्या अडचणी सोडवण्याचे आणि त्यांच्या उत्पादित मालाला योग्य दर्जा आणि किंमत तसेच योग्य कार्यवाही करण्याची जबाबदारी ही जिल्हा सहकारी संघाची असते. या जिल्हा सहकारी संघामध्ये विविध संस्थांचा समावेश असतो.ज्याप्रमाणे तालुका सहकारी संघाचे कार्यक्षेत्र हे तालुक्या पुरते मर्यादित असते त्याच प्रमाणे जिल्हा सहकारी संघाचे कार्यक्षेत्र हे जिल्हा पुरते मर्यादित असते. म्हणजेच जिल्हा स्तरावर तील सहकारी संस्थांच्या कामकाजावर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हा सहकारी संघाची असते.तालुका सहकारी संघांना मार्गदर्शन करण्याचे काम जिल्हा सहकारी संघाचे असते.

आता आपण राज्य सहकारी महासंघाचा अभ्यास करूया.

## ३. राज्य सहकारी महासंघ (State Co-operative Federation)

राज्य सहकारी महासंघाचे कार्यक्षेत्र हे विशिष्ट राज्यापुरते मर्यादित असते. राज्य सहकारी महासंघाची स्थापना ही राज्यातील विविध जिल्हा सहकारी संघांनी एकत्रित येऊन झालेली असते. म्हणजेच जिल्हा पातळीवर असणाऱ्या जिल्हा सहकारी संघाच्या अडचणी सोडवून त्यांच्या कामकाजावर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याचे कामकाज हे राज्य सहकारी महासंघ करत असतात. या राज्य सहकारी महासंघ या मध्ये प्रत्येक जिल्ह्याचा सहकारी संघ सहभागी असतो. म्हणजेच ज्या प्रमाणे तालुका सहकारी संघात ची वरिष्ठ संस्था म्हणजे जिल्हा सहकारी संघ म्हणून पाहिले जाते त्याचप्रमाणे जिल्हा सहकारी संघाची वरिष्ठ संस्था ही राज्य सहकारी महासंघ असते. म्हणजेच राज्य सहकारी महासंघ हा राज्यपातळीवर कामकाज पाहत असतो.जिल्हा सहकारी संघांना मार्गदर्शन करण्याचे काम राज्य सहकारी महासंघाचे असते.

आता आपण राष्ट्रीय सहकार महासंघ चा अभ्यास करूया.

## ४. राष्ट्रीय सहकार महासंघ ( National Co-operative Federation)

ज्याप्रमाणे जिल्हा सहकारी संघ यांचा मिळून राज्य सहकारी महासंघ तयार होतो त्याच पद्धतीने राष्ट्रीय सहकार महासंघाची स्थापना ही राज्य सहकारी महासंघाने एकत्र येऊन झालेली असते. म्हणजेच राष्ट्रीय पातळीवर असणारी सहकारी संस्थेची एक वरिष्ठ संस्था म्हणजेच राष्ट्रीय सहकार महासंघ. राज्यपातळीवर असणाऱ्या राज्य सहकार महासंघाच्या अडचणी सोडवून त्यांच्या कामकाजावर ती देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही राष्ट्रीय सहकार महासंघाची असते. राष्ट्रीय सहकार महासंघ हा राष्ट्रीय

पातळीवर ती कामकाज पाहत असतो म्हणजेच या राष्ट्रीय सहकार महासंघाची चे कार्यक्षेत्र हे देश पातळीवर म्हणजेच देशापुरते मर्यादित असते. राज्य सहकार महासंघाची वरिष्ठ संस्था म्हणून राष्ट्रीय सहकार महासंघाकडे पाहिले जाते.राज्य सहकारी महासंघ यांना मार्गदर्शन करण्याचे काम राष्ट्रीय सहकार महासंघाचे असते.

आता आपण सर्वात उच्च आणि शेवटच्या सहकारी संघाचा अभ्यास करूया.

### ५. आंतरराष्ट्रीय सहकार महासंघ (International Co-operative Federation)

आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध राष्ट्रीय महासंघाचे प्रतिनिधी एकत्र येऊन या आंतरराष्ट्रीय सहकार संघाची स्थापना केलेली असते. या आंतरराष्ट्रीय सहकार महासंघाची जबाबदारी ही प्रत्येक देशाच्या राष्ट्रीय सहकार महासंघावर नियंत्रण आणि देखरेख ठेवणे असते. थोडक्यात आंतरराष्ट्रीय सहकार महासंघ हा सहकार संघामधील किंवा सहकारी संस्थांमधील सर्वात उच्च म्हणजेच सर्वोच्च म्हणजेच शिखर संस्था आहे जी आंतरराष्ट्रीय ला पातळीवर कामकाज करत असते.

**सहकारी संघाचे महत्त्व किंवा फायदे**

१. प्रत्येक कनिष्ठ पातळीवरील संघाला त्यांच्या वरिष्ठ पातळी संघाकडून मार्गदर्शन आणि संरक्षण प्राप्त होते.

२. सगळ्या पातळीवरील प्रश्नांची सोडवणूक या संघामुळे होते.

३. प्रत्येक संघाची कढी एकमेकांना जुळली असल्यामुळे सहकार क्षेत्रातील सहकारी कामकाज हे उत्तम पद्धतीने चालू आहे.

४.सहकारी संघामुळे देशातील सहकारी चळवळीला चांगला हातभार लागलेला आहे.

५. समाजामध्ये सहकार क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे.

६. मुख्यतः ग्रामीण पातळीवर, तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवर, राज्य पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही रोजगार उपलब्ध होत आहे.

---

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ.धीरज झाल्टे व इतर, सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती(२०२०), प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.

२) प्रा.नंदा लहाडे, सहकार (२०१३), आयडॉल पब्लिकेशन, पुणे.

३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे : सहकार

४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे

५) डॉ. आर के दातीर (२००९) ‘भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे

६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर